Title of Programme: डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन

Name of Organizing Department:**मराठी विभाग**
Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**
Date of the Programme :१/३/ २०२५
Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**
Target Group: मराठी विभागातील **विद्यार्थी**

Number of Participants: ११०

Name of Resource Person: संस्थाध्यक्ष **ॲ**ड. देवेंद्र बुट्टेपाटील

Total Expenditure for the Programme: – १५००/-
Source of Funding: -**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**
**Report: '**डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन **'** उपक्रम अहवाल

दि.१/३/२०२५ रोजी हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून निर्मिलेल्या डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ, डॉ. पायल ओसवाल उपस्थित होते.

या विशेषांकातून मराठी विभागाने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या साहित्याचा परिचय तसेच त्यांचे संमेलनातील भाषण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

या विशेषांकाच्या प्रकाशन प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लोकसाहित्याच्या अभ्यासक असलेल्या संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा झाली. त्यांनी केलेली तात्विक मांडणी महाराष्ट्र धर्म पुढे घेऊन जाणारी आहे. धर्म अथवा भाषेच्या बाबतीत एकारलेपणा टिकत नाही. समाजजीवनात रूढी व चाली महत्त्वाच्या असतात, असे डॉ. भवाळकर

HRM

यांनी ठणकावून सांगितले होते. मराठी भाषा आणि संस्कृती याबाबत जिव्हाळा असणाऱ्या प्रत्येकाने त्यांचे छापील भाषण वाचून मंथन करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. मराठी विभाग हा एक उपक्रमशील विभाग असून मराठी भाषा व साहित्यासाठी सातत्याने कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करीत असल्याबद्दल ॲड. बुट्टेपाटील यांनी कौतुक केले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. तारा भवाळकर यांचे भाषण वाचून त्यावर चर्चा करण्याचे आवाहन केले.

प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.




डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन करताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे


खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर
मराठी विभाग
मराठी भाषा गौरव दिन
ई-विशेषांक
डॉ. तारा भवाळकर
विशेषांक
संपादक मंडळ
डॉ. संजय शिंदे (उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख)
डॉ. बाळासाहेब अनुसे
प्रा. रौनक भिसे
कु. शुभम गायकवाड
कु. वैष्णवी लोखंडे



# डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन

**राजगुरूनगर** : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून निर्मिलेल्या डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ, डॉ. पायल ओसवाल उपस्थित होते. या विशेषांकातून मराठी विभागाने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या साहित्याचा परिचय तसेच त्यांचे संमेलनातील भाषण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले की, नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लोकसाहित्याच्या अभ्यासक असलेल्या संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा झाली. त्यांनी केलेली तात्विक मांडणी महाराष्ट्र धर्म पुढे घेऊन जाणारी आहे. धर्म अथवा भाषेच्याम बाबतीत एकारलेपणा टिकत नाही. समाजजीवनात रूढी व चाली महत्त्वाच्या असतात, असे डॉ. भवाळकर यांनी ठणकावून सांगितले होते. मराठी भाषा आणि संस्कृती याबाबत जिव्हाळा असणाऱ्या प्रत्येकाने त्यांचे छापील भाषण वाचून मंथन करणे आवश्यकआहे, असे ते म्हणाले. मराठी विभाग हा एक उपक्रमशील विभाग असून मराठी भाषा व साहित्यासाठी सातत्याने कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करीत असल्याबद्दल ॲड. बुट्टेपाटील यांनी कौतुक केले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. तारा भवाळकर यांचे भाषण वाचून त्यावर चर्चा करण्याचे आवाहन केले.

# राजगुरू महाविद्यालयात डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन



**राजगुरूनगर :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ, डॉ. पायल ओसवाल उपस्थित होते.

या विशेषांकातून मराठी विभागाने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या साहित्याचा परिचय तसेच त्यांचे संमेलनातील भाषण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील म्हणाले, नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लोकसाहित्याच्या अभ्यासक असलेल्या संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा झाली. त्यांनी केलेली तात्विक मांडणी महाराष्ट्र धर्म पुढे घेऊन जाणारी आहे. धर्म अथवा भाषेच्या बाबतीत एकारलेपणा टीकत नाही. समाजजीवनात रूढी व चाली महत्त्वाच्या असतात, असे डॉ. भवाळकर यांनी ठणकावून सांगितले होते. मराठी भाषा आणि संस्कृती याबाबत जिव्हाळा असणाऱ्या प्रत्येकाने त्यांचे छापील भाषण वाचून मंथन करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. मराठी विभाग हा एक उपक्रमशील विभाग असून मराठी भाषा व साहित्यासाठी सातत्याने कार्यक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करीत असल्याबद्दल ॲड. बुट्टेपाटील यांनी कौतुक केले.

# राजगुरू महाविद्यालयात डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन



**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर विशेषांकाचे प्रकाशन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, डॉ. गणेश धुमाळ उपस्थित होते. या विशेषांकातून मराठी विभागाने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या साहित्याचा परिचय तसेच त्यांचे संमेलनातील भाषण विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिले आहे.

या प्रसंगी बोलताना संस्थाध्यक्ष बुट्टेपाटील म्हणाले, दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात लोकसाहित्याच्या अभ्यासक असलेल्या संमेलनाध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांच्या भाषणाची सर्वत्र चर्चा झाली. त्यांनी केलेली तात्त्विक मांडणी महाराष्ट्र धर्म पुढे घेऊन जाणारी आहे. धर्म अथवा भाषेच्या बाबतीत एकारलेपणा टिकत नाही.

डॉ. संजय शिंदे
**मराठी विभाग प्रमुख**
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर,ता.खेड,जि.पुणे.